

## खलिका यांच्याकडून गरिबांना अन्नदान

**सोलापूर** : सोलापुरात रोटी बँक संस्थेच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत सामाजिक कार्यकर्ते आसिफभाई बागबान खलीफा यांनी शासकीय रुग्णालय जिल्हा सोलापूर येथे आपल्या वाढदिवसाचा वायफळ खर्च टाळून तीनशेच्या आसपास गोरगरीब गरजू रुग्णांना व रुग्णांचे नातेवाईकांना अन्नदान करून आपला वाढदिवस रोटी बँक संस्थेसोबत साजरा केला. संस्थेने जनतेला आवाहन केले होते की आपण जे वाढदिवस साजरा करतो त्यामध्ये केक, फटाके, शाल, पार्टी, कलर यामध्ये आपले पैसे खर्च न करता आपण आमच्या संस्थेसोबत अन्नदान करून आपला वाढदिवस साजरा करू शकतात. जेणेकरून तुमच्या वाढदिवस एक आदर्श वाढदिवस ठरू शकतो आणि तुम्हाला पुण्य भेटेल आणि गरीब लोकांचा आशीर्वाद पण मिळेल आणि आम्ही तुम्हाला पुष्पगुच्छ व मिठाई देऊन आणि तुमच्या हातांनी जेवण वाटप करू आणि फोटो व्हिडिओच्या माध्यमातून बातमी पण देऊ. यावेळी संस्थेचे अध्यक्ष जमीरभाऊ पठाण यांनी संस्थेच्या या नवीन उपक्रमाबद्दल माहिती दिली आणि आवाहन पण केले की दररोज एक वेळचा संध्याकाळच्या जेवण न चुकता रोटी बँकतर्फे देण्यात येते. तरी आपण रोटी बँक सोबत आपला वाढदिवस साजरा करावा आणि आपला देश गंगा जमुना संस्कृतीचा प्रतीक आहे त्यासाठी समाजामध्ये शांती, अमन, भाईचारा, राष्ट्रीय एकात्मता आणि मानवतेच्या हितासाठी जेवढे काम होईल तेवढा काम करावा.यावेळी सोमनाथ उपासे, समीर पठाण, सत्तार शेख ,जुबेर सय्यद, तंनजिम चे हाफिज मेहबूब नदाफ,भारतीय अमन ग्रुपचे नजीर अहमद मुजावर, ड. आसीम बांगी, इरफान सय्यद, मनोज देवकर, शोएबभाई चौधरी, फैयाज बागवान, फैयाज शेख, साकिब खलिफा, आनंद गोसकी, अबिदभाई राईली, साहिल शहापुरे व सर्व रोटी बँक संस्थेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

## गावडी दारफळ येथे बापलेकास केबलवायरने मारहाण ; तिघांवर गुन्हा

**सोलापूर** : मागील भांडणाच्या कारणावरू वडील आणि मुलाला केबलवायर आणि लाथाबुक्क्याने मारहाण केल्याची घटना गावडी दारफळ (ता.उत्तर सोलापूर) येथील ग्रामपंचायत समोर रविवारी रात्री घडली. ब्रह्मदेव उर्फ राजेंद्र महादेव माने, केशव जालिंदर माने आणि आप्पासाहेब चांगदेव शेंडगे (सर्व रा.गावडी दारफळ) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत अभिजीत नागनाथ मोरे (वय २७) यांनी मारहाणीची फिर्याद तालुका पोलीस ठाण्यात दिली आहे . रविवारी रात्रीच्या सुमारास फिर्यादी आणि त्याचे वडील हे गावातील ग्रामपंचायती समोर थांबले असताना वरील आरोपींनी त्यांना मारहाण केली. असे फिर्यादीत नमुद आहे .हवालदार पाटील हे पुढील तपास करीत आहेत.

## माती नेण्यास विरोध; टॉमिने मारहाण; तिघांवर गुन्हा

**वैराग** : शेतातील माती नेण्यास विरोध केल्याने एकास लोखंडी टॉमि आणि काठीने मारहाण केल्याप्रकरणी वैराग पोलीस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आकाश गाडेकर, अमोल खटोड आणि दयानंद भड (तिघे रा.आळजापूर ता. बार्शी) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत सुभाष श्रीहरी भोसले (वय ४९ रा. रवळगाव ता. बार्शी) यांनी पोलीसात फिर्याद दिली. ते १८ एप्रिल रोजी सायंकाळी आळजापूर येथील आपल्या शेतात झेंडू पिकास पाणी देण्यासाठी गेले होते. त्यावेळी आरोपी हे फिर्यादीच्या शेतातील काळी माती पोकलेन ट्रॉलीच्या साह्याने घेऊन जाताना दिसले . तेव्हा त्यांनी हटकले होते. त्यावेळी वरील आरोपींनी त्यांना शिवीगाळ करून लोखंडी टॉमिने मारहाण केली. हवालदार पाडूळे पुढील तपास करीत आहेत.

## झी युवा वर 'जय भीम' एका महानायकाची गाथा

**सोलापूर** : दलित समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणणारे,राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे, स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री असलेले,सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभी करणारे, संविधानातील मुलभूत हक्कांचा अधिकार देणारे,बौध्द धर्माला पुनरूज्जीवन देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट पाहण्याची पर्वणी प्रेक्षकांना नव्याने मिळणार आहे.विविध विषयांवरील प्रबोधनातून मनोरंजन देणाऱ्या झी युवा या वाहिनीवरून सुरू होत असलेल्या जय भीम एका महानायकाची गाथा या मालिकेतून डॉ.आंबेडकर यांचे कार्य या मालिकेतून उलगडणार आहे.१४ एप्रिल या डॉ.आंबेडकर यांच्या जयंतीदिनी या मालिकेला सुरूवात झाली असून,महानायकाच्या आयुष्यातील संघर्षापासून ते त्यांनी समाजाच्या परिवर्तनासाठी दिलेल्या योगदानाचा आलेख पाहता येणार आहे.

# मुख्यमंत्री बदलण्याच्या चर्चेने मुख्यमंत्री नाराज

## सुट्टी घेऊन तडकाफडकी गावी निघून गेले?

सुराज्य/मुंबई

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भाजपला अपेक्षित अशी कामगिरी करता न आल्याने दिल्लीत पडद्यामागे मुख्यमंत्री बदलण्याच्या हालचाली सुरु आहेत, असे वक्तव्य खासदार संजय राऊत यांनी केले होते. राऊतांच्या या दाव्यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली होती. ही सगळी चर्चा सुरु असतानाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाराज होऊन साताऱ्याला त्यांच्या गावी निघून गेल्याची आणखी एक वदंता राजकीय वर्तुळात पसरली आहे. भाजपकडून पडद्यामागून अजित पवार यांच्याशी सुरु असलेल्या वाटाघाटी आणि मुख्यमंत्री बदलण्याच्या हालचाली या बातम्यांमुळे एकनाथ शिंदे हे नाराज झाल्याचे सांगितले जाते. त्यामुळे त्यांनी तडकाफडकी तीन दिवसांसाठी साताऱ्याला जाण्याचा निर्णय घेतला, अशी कुजबूज सुरु आहे. या पार्श्वभूमीवर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी स्पष्टीकरण देत हा दावा फेटाळून लावला आहे.**



उदय सामंत हे मंगळवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज होऊन गावाला निघून गेले आहेत का, असे विचारण्यात आले. त्यावर उदय सामंत यांनी म्हटले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गावची जत्रा आहे. ते गावच्या जत्रेला गेले आहेत. गावच्या जत्रेला गेल्यावरही मुख्यमंत्री नाराज आहे असं कुणी म्हणत असेल, तर त्यांचा नागरी सत्कार त्यांच्याच जत्रेत केला पाहिजे, असे उदय सामंत यांनी म्हटले.

संजय राऊत यांनी महाराष्ट्रातील मुख्यमंत्री बदलण्याच्या हालचाली सुरु असल्याचा दावा केला होता. भाजपला मविआचे सरकार पाडायचे होते. त्यासाठी एकनाथ शिंदेंचा वापर झाला, ते काम पूर्ण झाले आहे. पण राजकीयदृष्ट्या भाजपला महाराष्ट्रात ताकद देण्यात हे मुख्यमंत्री अपयशी ठरले आहेत. त्यामुळे आता दिल्लीत मुख्यमंत्री बदलण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत, असा दावा संजय राऊत यांनी केला होता. यावरुन राजकीय वर्तुळात बराच गदारोळ झाला होता. ही सगळी चर्चा सुरु असताना एकनाथ शिंदे हे आश्चर्यकारकरित्या तीन दिवसांची सुट्टी घेऊन साताऱ्यातील त्यांच्या गावी निघून गेले.

सूत्रांच्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे तीन दिवसांसाठी गावी जाणार, असा कोणताही कार्यक्रम ठरला नव्हता. परंतु, जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांशी झालेल्या बैठकीनंतर एकनाथ शिंदे यांनी त्यांच्यासोबत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना गावी जात असल्याचा संदेश पाठवला. एकनाथ शिंदे हे २४ ते २६ एप्रिल हे तीन दिवस गावी असणार आहेत. महाराष्ट्रात राजकीय घडामोडींना वेग आला असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सर्व कार्यक्रम रद्द करून गावाला निघून गेल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या.

'न्यू इंडियन एक्स्प्रेस'च्या वृत्तानुसार, भाजप पडद्यामागून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्याशी ज्याप्रकारे चर्चा करत आहे, ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना फारसे पसंत नाही. भाजपच्या ठरवलेल्या अजेंड्यानुसार आणि रणनीतीनुसार सर्वकाही व्यवस्थित सुरु असताना भाजपकडून पडद्यामागे अजित पवार यांना हाताशी धरून वेगळ्या राजकीय समीकरणांची आखणी सुरु आहे. या टप्प्यावर अशा काही राजकीय घडामोडी घडतील, याची अपेक्षा एकनाथ शिंदे यांना नव्हती. त्यामुळे एकनाथ शिंदे हे नाराज होऊन तीन दिवसांसाठी गावी निघून गेल्याचे वृत्त आहे.

# हातभट्टी दारू व रसायनासह एक लाखांचा मुद्देमाल जप्त

सुराज्य/सोलापूर

राज्य उत्पादन शुल्क विभागाने जिल्ह्यात विविध हातभट्टी निर्मितीच्या ठिकाणांवर धाडी टाकून सहा गुन्हे दाखल करुन एक लाख १७ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे.

उत्पादन शुल्क विभागाच्या निरीक्षक अ' विभाग, ब' विभाग, भरारी पथक व सीमा तपासणी नाक्याच्या पथकांनी मंगळवारी दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव तांडा व वडजी तांडा या हातभट्टी ठिकाणांवर धाडी टाकून तीन गुन्ह्यांत चार हजार सहाशे लीटर गूळमिश्रित रसायन असा एक लाख सहा हजारांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत दोन आरोपी फरार झाले असून त्यांचा शोध सुरू आहे. पंढरपूर विभागाचे निरीक्षक पवन मुळे यांनी पथकासह करमाळा तालुक्यातील रावगाव, फुंदेवाडी व हिसरे गावातील हातभट्ट्यांवर धाडी टाकून १५ लीटर हातभट्टी दारू, २७५० लीटर रसायन असा ६४ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पंढरपूर विभागाने या कारवाईत फुंदेवाडी येथील सुरेश लक्ष्मण पवार, हिसरे येथील शांताबाई रोहिदास पवार या आरोपींना अटक केली असून त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई निरीक्षक सदानंद मस्करे, सुरज कुसळे, पवन मुळे, सुनील कदम, दुय्यम निरीक्षक उषाकिरण मिसाळ, शीतल पवार, अंकुश अवताडे, शंकर पाटील, सहायक निरीक्षक गजानन होळकर, जवान इस्माईल गोडीकट, प्रशांत इंगोले, चेतन व्हनगुंटी, प्रकाश सावंत, भाग्यश्री शेरखाने, विकास वडमिले, गणेश रोडे यांच्या पथकाने केली.



### सहा ठिकाणी सीमा तपासणी नाके सुरू

कर्नाटक राज्याच्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क व पोलीस विभागाकडून सहा ठिकाणी तात्पुरते सीमा तपासणी नाके सुरू केले असून वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे. तसेच अवैध मद्य वाहतुकीवरही लक्ष ठेवले जात आहे. नागरिकांनी त्यांच्या परिसरात दारू निर्मिती, विक्री होत असल्यास त्याची माहिती या विभागास द्यावी, असे आवाहन उत्पादन शुल्क अधीक्षक नितीन धार्मिक यांनी केले आहे.

# इस्त्राईलच्या दौऱ्याला नेतो म्हणून शेतकऱ्याला दीड लाखास गंडविले

सुराज्य/वेळापूर

शेतीच्या माध्यमातून इस्त्राईल दौऱ्याला नेतो मिळून एका शेतकऱ्याकडून तब्बल १ लाख ६० हजार रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी वेळापूर पोलीसात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला. महेश भाऊसो कडू-पाटील (वय ४० रा.चिंतामणी रेसिडेंट लॉन्स, बाणेर, पुणे) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत संग्राम सिंह प्रतापराव दुपडे (रा. कोळेगाव ता. माळशिरस) यांनी पोलीसात नुकतीच फिर्याद दिली.

यातील आरोपीने अग्रीकल्चर ग्रॅज्युएट असोसिएशनच्या नावाखाली इस्रायल येथे सुधारीत शेतीची माहिती घेण्याकरता दौरा आखून या कार्यक्रमाला फिर्यादीला घेऊन जातो म्हणून एप्रिल २०२२ साली १ लाख ६० हजार रुपये आणि पासपोर्ट घेतले . मात्र आरोपीने त्यांना इस्त्राईलला घेऊन गेले नाही. आणि फरवणूक केली. असे फिर्यादीत म्हटले आहे . पुढील तपास हवालदार मेहरकर हे करीत आहेत .

# सांगोल्यात महिलांच्या सहभागाने महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

## शोभायात्रेचे उद्घाटन धर्मराज काडादी यांच्या हस्ते

सुराज्य/सांगोला

युगपुरुष महात्मा बसवेश्वर महाराज की जय हर हर महादेव च्या गजरात सोमवार दि.२५ रोजी म. बसवेश्वर मूर्तीच्या शोभायात्रेचे धर्मराज कडादी यांच्या हस्ते उद्घाटन झाले.शोभायात्रेत अश्वारूढ महात्मा बसवेश्वर महाराज, धार्मिक सजीव देखावे व महिलांचे लेझिम सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.



समता, मानवता या विचारांनी संपूर्ण समाजाला सर्वधर्म एकात्मतेचा संदेश देणारे म. बसवेश्वर यांच्या ८९२ व्या जयंतीनिमित्त सोमवारी सांगोला शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली.या शोभायात्रेचे उद्घाटन सोलापूर सिध्देश्वर देवस्थानचे चेअरमन धर्मराज कडादी, यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी प्रकाश परमशेट्टी (सोलापूर) म.वी.सभेचे माजी प्रांतिक अध्यक्ष प्रबुद्धचंद्र झपके, प्रदीप गुळमिरे, शिवलिंग उकळे सोमनाथ ढोले, अप्पासाहेब लोखंडे, तुकाराम गुळमिरे, भीमाशंकर पैलवान, गिरीश नष्टे, डॉ पियूष साळुंखे, रमेश तेली,प्रताप इंगोले, भारत साळुंखे, सनी पाटील, देविदास पाटणे, अमर उकळे युवक संघटनेचे अध्यक्ष ओंकार उकळे, बुंजकर वस्ती येथील समाज बांधव, म.वी. सभेचे सर्व पदाधिकारी, महीला संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

महात्मा बसवेश्वरांच्या सवाद्य मिरवणुकीमध्ये हलगी, बँड, डॉल्बी सह महिलांचे आकर्षक लेझीम सहभागी झाले होते. २१ एप्रिल पासून महात्मा बसवेश्वर जयंती च्या निमित्ताने महिलांच्या फनी गेम्स, पाककला, चित्रकला स्पर्धा संपन्न झाल्या तर महिलांचे सामूहिक रुद्र पठण हा धार्मिक कार्यक्रम संपन्न झाला. मिरवणुकीमध्ये सादर झालेले शंकर-पार्वती विवाह सोहळा, बसवेश्वरांची जीवनगाथा, समुद्रमंथन यासह अश्वारूढ महात्मा बसवेश्वर असे विविध सजीव देखावे व महिलांनी सादरीकरण केलेली लेझीम सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.वरील सर्व कार्यक्रमासाठी म.वी. सभेचे सर्व पदाधिकारी महात्मा बसवेश्वर युवक संघटनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच महिलांनी उत्स्फूर्तपणे सहकार्य करून मिरवणुकीची शोभा वाढवली.

# आ. सुभाष देशमुख यांच्यामुळे हत्तूरला ८ कोटींची विकासकामे पूर्ण

सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तूर-चंद्रहाळ गावात गेल्या दोन वर्षात एकूण आठ कोटीचे विकासकामे पूर्ण केल्याची माहिती गावच्या सरपंच ज्योती कुलकर्णी यांनी दिली.



सरपंच पदाचा दोन वर्षाचा कार्यकाल पूर्ण झाल्याबद्दल आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होत्या. यावेळी कुलकर्णी पुढे म्हणाल्या, आमदार सुभाष देशमुख यांच्या माध्यमातून गावाला मोठ्या प्रमाणात विकास निधी प्राप्त झाला आहे. यात गावात पथदिवे बसविणे, सौर पंपाने पाणीपुरवठा करणे,

शुध्द व स्वच्छ पाणी मिळण्यासाठी नवीन आरो प्लांट बसविणे,हत्तूर- चंद्रहाळ या दोन्ही गावात राष्ट्रीय पेयजल व जल जीवन मिशन अंतर्गत योजनेतून नवीन पाणीपुरवठा व्यवस्था करणे यासाठी ३कोटी ६४ लाख ,हत्तूर ते कुलकर्णी तांडा रस्ता करणे २ कोटी ६० लाख, गावात सिमेंट काँक्रिटीकरण रस्ता करणे ५० लाख, पाणंद रस्ता करणे ७५ लाख,

स्मशानभूमी देखभाल व दुरूस्ती करणे, १० लाख, दलित वस्ती सुधारणा अंतर्गत भूमिगत गटारी करणे ५० लाख, जिल्हा परिषदेच्या शाळेच्या खोली बांधणे ३९ लाख, यासह एकूण ८कोटी २२ लाखांपेक्षा अधिक कामे पूर्ण केले असून यातील काही कामे प्रगतीपथावर आहेत. सत्ताधारी गटाचे पॅनलप्रमुख राजेंद्र कुलकर्णी व सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ यांच्या सहकार्यातून ही कामे करता आली आहेत.

दोन वर्षापूर्वी जनतेनी आम्हाला मोठ्या विश्वासाने आम्हाला निवडून दिले आहे.जनतेचा विश्वास सार्थ करण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. या पुढील काळातही गावच्या विकासासाठी आपण कटिबध्द असून हत्तूर गाव तालुक्यातच विकासाचे नवे मॉडेल बनवण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू असेही सरपंच कुलकर्णी यांनी शेवटी बोलताना सांगितले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य विश्वनाथ पाटील, मारुती कुंभार, सुरेश सावंत, शाहिरा अत्तार, तात्यासाहेब कुलकर्णी, आनंदाबाई सीताफळे, चांदाबाई राठोड, सुरेश राठोड, मारुती कुंभार, सुनंदा पाटील, सोनाबाई जनगे उपस्थित होते.

# नवीन वाळू धोरणाची अंमलबजावणी १ मेपासून

## महाखनिज ॲप अथवा सेतू केंद्रात नोंदणी करून वाळू घेता येईल

सुराज्य/मुंबई

राज्य सरकारकडून वाळू धोरण जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार आता ग्राहकांना वाळू खरेदीसाठी महाखनिज ॲप अथवा सेतू केंद्रात नोंदणी करून संबंधित डेपोधारकास आधार क्रमांक द्यावा लागेल. येत्या १ मे पासून रेती/ वाळू धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

महसूल मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी सह्याद्री अतिथिगृह येथे महसूल कार्यालयातील उपायुक्त, विभागीय आयुक्त, अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांच्याशी या विषयाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करिर, जमाबंदी आयुक्त आणि भूमी अभिलेख संचालक एन.के. सुधांशू, यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

वाळू उत्खनन व्यवसायात शिरलेल्या अपप्रवृत्तींना नष्ट करणे याला प्राधान्य देणे गरजेचे आहे असे सांगून विखे- पाटील म्हणाले की, राज्य शासनाने जाहीर केलेल्या रेती/वाळू धोरणानुसार रेतीचे/ वाळूचे उत्खनन, साठवणूक आणि ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्री करण्यात येणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून वाळू/ रेतीचे सर्वंकष धोरण असावे याबाबतची मागणी होती. या नवीन धोरणामुळे सर्वसामान्यांना वाळू/रेती सोप्या पध्दतीने खरेदी करात येणार आहे. शिवाय अनधिकृत पध्दतीने होणारे रेती/वाळूचे उत्खनन यावर आळा बसणार आहे. सर्वसामान्यांना परवडेल अशा किमतीत रेती/ वाळू उपलब्ध व्हावी, वाळूची अवैध वाहतूक रोखली जावी यावर राज्य शासनाने भर दिला आहे. येत्या महाराष्ट्र दिनापासून या धोरणाची अंमलबजावणी करताना काय अडचणी येत आहेत याबाबतचा अभ्यास करण्यात यावा, असे महसूल मंत्री म्हणाले.

या नवीन धोरणानुसार प्रायोगिक तत्त्वावर एक वर्षासाठी सर्व नागरिकांना प्रति ब्रास ६००रुपये (रुपये १३३ प्रति मेट्रिक टन) वाळू विक्रीचा दर निश्चित करण्यात आलेला आहे. या निर्णयामुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळणार असून घरांच्या किमतीही आवाक्यात येण्यास मदत होणार आहे. वाळू लिलाव बंद होणार असल्याने डेपोतूनच ६०० रुपयात वाळू उपलब्ध होणार आहे. या धोरणानुसार स्वामित्व धनाची रक्कम माफ करण्यात येईल. याशिवाय जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी व वाहतूक परवाना सेवा शुल्क इत्यादी खर्च आकारण्यात येतील.

# जुन्या पेन्शनसाठी २६ हजार शिक्षक-कर्मचारी करणार आंदोलन : दत्तात्रय सावंत

## ३ मेपासून आझाद मैदानावर धरणार धरणे

सुराज्य/पंढरपूर

**महाविकास आघाडी सरकारने खोट्या माहितीच्या आधारावर केलेल्या अहवालामुळे आज राज्यातील २६ हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी जुन्या पेन्शन योजनेपासून वंचित असून त्यांना न्याय न मिळाल्यास ३ मे पासून मुंबई येथील आझाद मैदानावर राज्यभरातील शिक्षकांसह बेमुदत आंदोलन करणार असल्याचा इशारा माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांनी पत्रकार परिषदेत दिला.**



याबाबत माहिती देताना दत्तात्रय सावंत यांनी स्पष्ट केले की, केंद्र सरकारच्या आदेशानुसार महाराष्ट्र सरकारने १ नोव्हेंबर २००५ पासून जुनी पेन्शन योजना रद्द केली. २००५ नंतर नियुक्त शिक्षक, कर्मचारी यांच्यासाठी हा निर्णय होता. परंतु १९९० पासून कार्यरत असणाऱ्या राज्यातील ३५० तालुक्यातील २६ हजार शिक्षक, कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शन योजनेमधून वगळण्यात आले आहे. २००५ नंतरच्या शिक्षक, कर्मचाऱ्यांसाठी हा कायदा असताना त्या पूर्वीच्या नियुक्त शिक्षक व कर्मचाऱ्यांना या योजनेमधून का वगळण्यात आले आहे? असा प्रश्न सावंत यांनी उपस्थित केला. हा शिक्षण क्षेत्रावर सर्वांत मोठा अन्याय आहे. कारण शासनाच्या अन्य कोणत्याच खात्यामध्ये अशी चूक झाली नाही किंवा २००५ पूर्वीचा कोणताही शासकीय कर्मचारी जुन्या पेन्शन पासून वंचित नाही. याच्या विरोधात राज्यात सर्व शिक्षक कर्मचारी व संघटना एकत्र येऊन आंदोलन करणार असल्याचे जाहीर केले.

दरम्यान यांप्रकरणी महाविकास आघाडीने एक समिती नियुक्त केली होती. या समितीने संबंधित २६ हजार कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू केल्यास राज्यावर १ लाख १५ हजार कोटींचा बोजा पडेल असा खोटा अहवाल दिला आहे. या चुकीच्या अहवालामुळे या शिक्षक, कर्मचाऱ्यांची आज बिकट अवस्था झाली आहे. यापैकी अनेक शिक्षक निवृत्त झाले आहेत. काही जणांवर अक्षरशः भाजी विकण्याची वेळ आली आहे, असा दावा सावंत यांनी केला. विशेष म्हणजे या शिक्षक व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली नसली तरी पाचवा, सहावा व सातवा आयोगामधील फरकाच्या रकमा, भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करण्यात आला आहे. वेतनातून पी.एफ. कपात सुरू आहे. मात्र जुनी पेन्शनसाठी त्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. या प्रकरणी न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे. मात्र त्यापूर्वी शासनाने हा अन्याय दूर करावा, अन्यथा राज्यभरातील शिक्षक मुंबई येथे ३ मे पासून बेमुदत धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा दत्तात्रय सावंत यांना दिला आहे.

या पत्रकार परिषदेस पुणे येथील राजेंद्र आसबे, सातारा येथील मारुती गायकवाड, सोलापूरचे कुंडलिक पवार, कोल्हापूरचे समाधान घाडगे, सांगलीचे शिवाजी चव्हाण, अमोल कुलकर्णी आदींसह शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.